घनकचरा व्यवस्थापन विभाग (स्वच्छ भारत अभियान नागरी २.०)
जाहिर प्रकटन

इचलकरंजी महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत स्वच्छ भारत अभियान कडून इचलकरंजी शहरात स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० मधील क्षमता बांधणी घटकांतर्गत शहरातील विविध घटकांकरिता स्वच्छते विषयी व्याख्यानमाला आयोजित करणेकामी अंदाजपत्रक तयार करणेसाठी व्यक्ती / संस्थांकडून दरपत्रक / कोटेशन मागविणेत येत आहे.

(स्मृती पाटील)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

दरपत्रक देणाऱ्या मक्तेदार व्यक्ती/ संस्था यांनी सिलबंद लिफाफामध्ये सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे-

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र / व्यक्ति असल्यास आधारकार्ड झेरॉक्स प्रत.
२) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये विविध साहित्य / सेवा पुरविलेचा अनुभव प्रमाणपत्र.
३) मक्तेदाराचे पॅन कार्ड याची सत्य प्रत.
४) मक्तेदाराचा GST अकाऊंट क्रमांक असणे आवश्यक आहे.
५) निविदाकराच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असलेस त्याबाबत कुलमुखत्यारपत्र
६) मक्तेदार कोणत्याही शासकिय /निमशासकिय संस्थेच्या काळ्या यादीत नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.
७) दरपत्रक /कोटेशन लेटर हेडवर सही शिक्क्यासहित.

अटी / शर्ती-

१. सदर जाहिर प्रकटन http://ichalkaranjimnp.in या इचलकरंजी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १७ / ०२ /२०२५ रोजी पासून दि.२१ / ०२ /२०२५ पर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.
२. इचलकरंजी महानगरपालिकेच्या बारनिशी विभागाकडे सिलबंद लिफाफामध्ये दरपत्रक / कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत दि. .२१ / ०२ /२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत राहील.
३. शक्य झालेस प्राप्त दरपत्रक / कोटेशन दि. २१ / ०२ /२०२५ दुपारी ४.३० वाजता उपस्थित मक्तेदार यांचे समोर उघडणेत येईल.
४. कोणतेही दरपत्रक /कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.
५. अर्जदार/ संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का तसेच पानांकन असणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांवर सही व शिक्का नसल्यास अर्जदाराचा विचार करता येणार नाही.
६. सदरचे दरपत्रक /कोटेशन हे अंदाजपत्रक तयार करणेकामी मागविणेत येत आहेत .
७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील सर्व संबंधित तरतुदी लागू राहतील.

(स्मृती पाटील)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका